# प्रकरण ५

# उपसंहार

# उपसंहार

प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये 'साखरफेरा' (मोहन पाटील) 'बुझ्र्वागमन' (दिवाकर चौधरी) या दोन कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला असून त्यांची एकूण पाच प्रकरणामध्ये विभागणी करण्यात आली आहे. प्रस्तुत उपसंहार या प्रकरणामध्ये 'साखरफेरा', 'बुझ्र्वागमन' या दोन्ही कादंबऱ्यांच्या अभ्यासाअंती विविध प्रकरणातून मांडलेल्या सविस्तर वृत्तांतातून जे निष्कर्ष हाती आले याची मांडणी येथे केली आहे.

१९६० नंतरचे कादंबरी वाङ्मय व कादंबरी वाङ्मय प्रकारचे स्वरूप, संज्ञा, व्याख्या व पार्श्वभूमी यांचा थोडक्यात परामर्श पहिल्या प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे. मराठी कादंबरीचा अभ्यास करताना कादंबरीची निर्मिती, पार्श्वभूमी माहिती असणे आवश्यक असते. यासाठी कादंबरीच्या निर्मिती पासून थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी साहित्यातील गद्य साहित्य प्रकारात कादंबरी, कथा, आत्मकथन, चरित्र, आत्मचरित्र असे अनेक प्रकार आहेत. यातील कादंबरी हा गद्य साहित्य प्रकारातील एक लोकप्रिय साहित्य प्रकार आहे. मराठी कादंबरी वाङ्मय हा गद्य प्रकार महाराष्ट्राचा सामाजिक, राजकीय ऐतिहासिक दस्तऐवज ठरावा एवढी वैविध्यपूर्ण निर्मिती कादंबरीच्या क्षेत्रात सर्व स्तरातून झालेली आहे. कोणत्याही अवस्थेत लोकांचे मनोरंजन करण्याचे सामर्थ्य कादंबरीमध्ये आहे. कादंबरी या वाङ्मय प्रकाराला दिडशे वर्षाची परंपरा आहे. तसेच अठरा, एकोणीस व विसाव्या शतकाची पार्श्वभूमी लाभली आहे. पारतंत्र्य, स्वातंत्र्य, स्वातंत्र्योत्तर अशा तिन्ही काळातील बदलते स्वरूप समाविष्ट झालेला कादंबरी हा वाङ्मय प्रकार आहे. कादंबरीमध्ये १९६० नंतर विविध वाङ्मय प्रकार निर्माण झाले. त्यातील ग्रामीण कादंबरीने ग्रामीण जीवनाचे चित्रण वास्तवपद्धतीने साकारून ग्रामीण जीवनपटच वाचकांच्या समोर उभा केला. या प्रवाहात अनेक लेखकांनी लेखन केले. त्यामध्ये आनंद यादव यांची 'गोतावळा', प्रा. सदानंद देशमुख यांची 'तहान', 'बारोमास', शेषराव मोहिते यांची 'अस जगणं तोलाचं धूळ पेरणी', कृष्णा खोत 'गावठाण', प्रकाश देशपांडे यांची 'बारदान', मोहन पाटील 'साखरफेरा', दिवाकर चौधरी 'बुझ्र्वागमन' इत्यादी कादंबरीकारांनी मोलाची भर घालून ग्रामीण साहित्यात आपला ठसा उमटविला. मराठी समाजातील अनेक स्थित्यंतरांचा वेध मराठी कादंबरी घेत असल्यामुळे समाजातील

वैशिष्ट्यपूर्ण घटनांच्या क्रिया–प्रतिक्रियांचा वेध मराठी कादंबरी घेताना दिसते. गेल्या ५–६ वर्षापासून सातत्याने महाराष्ट्रातील कृषी व्यवस्था संकटात सापडली आहे. कृषी व्यवस्थेमागील आर्थिक गणितच ढासळल्यामुळे शेतकरी अडचणीत आला. त्या समस्येचा वेध अनेक कादंबऱ्यांनी घेतला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये कादंबरी या शद्वाची उत्पत्ती, स्वरूप, संज्ञा, व्याख्या यांचा थोडक्यात अभ्यास केला आहे. कादंबरी या शद्वाची उत्पत्ती कशी झाली तर इंग्रजीमध्ये Novella हा इटालिन Novus हा लॅटिन व त्यापासून Novel हा इंग्रजी शद्व कादंबरीसाठी वापरला जाऊ लागला. त्यासाठी Fiction ही संज्ञाही वापरली जाते. तसेच संस्कृत कवी बाणभट्टाने रचलेल्या कथेचे नाव 'कादंबरी' होते. ती वाचकांना खूप आवडली. तेव्हापासून अद्‌भूत काल्पनिक अशा प्रकारच्या कादंबरीना कादंबरी म्हणण्याची प्रथा सुरू झाली. कादंबरीची व्याख्या निश्चित अशी करता येत नाही. कारण कादंबरीच्या निर्मितीपासून बदलत्या काळानुसार कादंबरीच्या स्वरूपात बदल होत गेले. तरीसुद्धा संशोधकांनी आपल्या संशोधनानुसार कादंबरीच्या काही व्याख्या केल्या आहेत. ''आधुनिक मराठी साहित्यात प्रदीर्घ लांबीच्या कथात्मक गद्य साहित्य प्रकारास कादंबरी म्हटले आहे.''

समाजातील घडामोडींचा परिणाम मानवी जीवनावरती होत असतो आणि या परिणामांमुळे मानवी जीवनात अनेक बदल घडत असतात. हे बदल या घटनांचे दर्शन कमी–अधिक प्रमाणात साहित्यातून शद्वबद्ध होत असतात. सर्वसाधारण कादंबरीचा विचार करता कादंबरीमध्ये पुढील प्रमाणे घटक असतात. कथानक, व्यक्तिरेखा, निवेदन, वातावरण, भाषाशैली, कथानक–कथानक म्हणजे कादंबरीकाराने वाचकांसमोर प्रसंगाची, घटनांची सुत्रबद्ध पद्धतीने केलेली मांडणी. म्हणजे वातावरण, व्यक्तिचित्रणे, निसर्ग, भाषाशैली इत्यादी घटकांचा वापर करून कथानक तयार केले जाते. व्यक्तिचित्रण – कादंबरीमध्ये मुख्य गौण पात्रे वावरत असतात. मुख्यपात्र कथानक निर्माण करतात व गौण पात्रे कथानकाला पुढे नेण्यास मदत करतात. निवेदन – पूर्ण कादंबरी वाचकांपर्यंत निवेदकांच्या द्वारा सांगितले जाते. प्रत्येक कादंबरीमध्ये वेगवेगळ्या निवेदन पद्धतीचा वापर केला जातो. संवाद – संवाद जेवढे प्रभावी तेवढे जास्त वाचकांच्या हृदयाला भिडतात. संवादामुळे कथानकाला गतिमानता प्राप्त होऊन प्रत्यक्ष घटना घडत आहे असे वाटते. भाषाशैली – भाषाशैली वरती कादंबरीची

परिणामकारकता अवलंबून असते. हा कादंबरीचा महत्वाचा घटक मानला जातो. तसेच कादंबरीचा परिसर लक्षात येतो. कादंबरी ही संपूर्ण घटकांवरती अवलंबून असते. कादंबरीच्या रचनेत बदल होत असला तरी तिचे घटक मात्र पूर्वीपासून तेच आहेत. त्यात कोणताही बदल झालेला नाही.

अभ्यासासाठी कादंबरीच्या कालखंडाचे चार भाग केले जातात. त्यातील पहिला कालखंड म्हणजे इ. स. १८४१ ते १८८५ या कालखंडातील इ. स. १८४१ साली प्रसिद्ध झालेली हरि केशवजी यांची 'यांत्रिकक्रमण' या कादंबरीला पहिल्या कादंबरीचा मान मिळाला पाहिजे होता. परंतु ती अनुवादित असल्यामुळे बाबा पद्मनजी यांच्या इ. स. १८५७ साली लिहलेल्या 'यमुनापर्यन' या सामाजिक कादंबरीला मराठीतील पहिल्या स्वतंत्र कादंबरीचा मान मिळाला. यानंतर इ. स. १८६१ साली 'लक्ष्मणशास्त्री हळबे' यांची 'मुक्तामाला' ही अद्भूतरम्य व घटनाप्रधान कादंबरी प्रसिद्ध झाली. बऱ्याच टिकाकारांनी 'मुक्तामाला' या कादंबरीला मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान दिला आहे. परंतु कालमानाचा विचार करता 'यमुनापर्यटन' या कादंबरीला मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान दिला गेला. 'मुक्तामाला' या कादंबरीमुळे रंजनपर कादंबरीची मोठी परंपराच निर्माण झाली. त्यामुळे या परंपरेचे अनुकरण करून अनेक कादंबऱ्यांची निर्मिती झाली. रंजनपर कादंबऱ्यांची परंपराच या कालखंडात निर्माण झाली. नारो सदाशिव रिसबुड 'मुंजुघोषा' १८६८, 'विश्वासराव' १८७०, केवश लक्ष्मण जोरवेकर 'विचित्रपुरी' १८७०, पांडुरंग गोविंद पारखी 'मित्रचंद्र' १८८० इ. कादंबऱ्या 'मुक्तामाले'च्याच स्वरूपाच्या आहेत. इतरही अनेक कादंबऱ्या या काळात उदयाला आल्या या कालखंडात 'यमुनापर्यटन' सारख्या सामाजिक प्रबोधनात्मक कादंबरी बरोबर रंजनात्मक अद्भूत, साहसी, स्वदेशवादी कादंबरीचा प्रवाह निर्माण झाला. स्त्रिया ज्या काळात चुल आणि मुल एवढ्यातच गुरफटल्या होत्या. शिक्षणाचे प्रमाण खूप कमी होते. त्या काळात कादंबरीच्या प्राथमिक अवस्थेत साळूबाई तांबवेकर यांनी 'चंद्रप्रभाविरहवर्णन' १८७३ ही कादंबरी लिहली.

इ. स. १८८५ ते १९२० या दुसऱ्या टप्प्यामध्ये मराठी साहित्याचा पाया भरण्याचे काम केले आहे. याचे श्रेय हरिभाऊ आपटे यांना जाते. हरिभाऊंनी सामाजिक, ऐतिहासिक, राजकिय अशा अनेक प्रकारच्या कादंबऱ्या लिहून हा कालखंड समृद्ध केला. त्यांनी 'पण लक्षात कोण घेतो' १८८३, 'मधली स्थिती' १८८५, 'मी यशवंत खरे'१८८५ इत्यादी अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहल्या. हरिभाऊंनी

सामाजिक कादंबऱ्यातून सुधारणावाद आणि ऐतिहासिक कादंबऱ्यांतून राष्ट्रवाद सांगितला. त्यांच्या कादंबऱ्यांमुळे मराठी कादंबरीला प्रतिष्ठा व लोकप्रियता मिळाली. तसेच हरिभाऊ हे याच काळातील नव्हे तर मराठी कादंबरी परंपरेतील महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून ओळखले जातात. हा कालखंड त्यांच्याच नावाने ओळखला जातो. तसेच या काळात अनेक कादंबरी मालांची निर्मिती झाली या कादंबरीमालातून अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. लोकांचे मनोरंजन करून योग्य संदेश देणे हा या मालांचा उद्देश होता.

नाथमाधव उर्फ द्वारकानाथ माधवराव चितळे यांनी 'सावळ्या तांडेल' इ. स. १९०८ ही पहिली प्रसिद्ध आरमारविषयक कादंबरी लिहली. तसेच त्यांनी सामाजिक स्त्रीशिक्षण विषयकही कादंबऱ्या लिहल्या. का. र. मित्र यांनी बंगाली कादंबऱ्यांची भाषांतरे केली. वि. सी. गुर्जर यांना या कालखंडातील यशस्वी अनुवादक म्हणून ओळखले जाते. मराठी वाचकांना रूचीपालट म्हणून काही वेगळे वाचायला मिळावे हा या कादंबरी निर्मिती पाठीमागचा उद्देश आहे. चि. वि. वैद्य यांना या कालखंडातील इतिहासाचे गाढे अभ्यासक, सुधारणावादी म्हणून ओळखले जातात. याशिवाय वा. म. जोशी, वि. सी. गुर्जर इत्यादी अनेक लेखकांनी या कालखंडात लेखन केले आहे. तसेच या कालखंडात स्त्री लेखिकांनीही लेखन करून हा कालखंड समृद्ध केला. त्यामध्ये साळुबाई तांबवेकर, काशिबाई कानिटकर, जानकीबाई देसाई इत्यादी लेखिका या कालखंडातील लोकप्रिय लेखिका होत्या. इतरही अनेक लेखक, लेखिकांनी या कालखंडात लेखन केले असले तरी या कालखंडावरती हरिभाऊंच्या कादंबरीचा प्रभाव पडलेला आहे. तसेच या नंतरच्या कालखंडातील लेखिकांनी त्यांच्या लेखनाचे अनुकरण केले आहे.

१९२० ते १९४७ या कालखंडात अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली. या काळातील राजकीय आंदोलनांचा, त्यातील वेगवेगळ्या स्थित्यंतराचा परिणाम साहित्यावरती झाला. तसेच या काळावरती गांधीवादाचा प्रभाव जाणवतो. १९२० नंतर फडके, खांडेकर–मांडखोलकर या दिग्गज लेखकांचा उदय या काळात झाला. हरिभाऊनंतरच्या पिढीतील ना. ह. आपटे हे महत्त्वाचे लेखक आहेत. आपटे यांनी सामाजिक प्रश्न आपल्या कादंबऱ्यातून शद्बबद्ध केले आहेत. याच कालखंडात वा. म. जोशी यांना तात्विक कादंबरीचे जनक मानले गेले आहे. श्री. व्यं. केतकर हे या काळातील सर्व संकल्पना

बाजूला ठेऊन स्वतःचे स्वतंत्र पद्धतीने लेखन करणारे लेखक आहेत. फडक्यांचा कलावाद आणि खांडकरांचा जीवनवाद मराठी साहित्यात हा वाद खूप गाजला तसेच त्यामुळे खूप बदलही झाले. फडके खांडेकर यांच्या परंपरेत लिहणारे पण आपला वेगळा ठसा उमटविणारे कादंबरीकार म्हणजे माडखोलकर होय. भार्गव विठ्ठल वरेकर यांना हरिभाऊं नंतरचे वास्तवादी कादंबरीकार मानले गेले आहे. या कालखंडात श्री. व्यं. केतकर, ना. सी. फडके, वि. वा. हडप, साने गुरूजी, प्र. य. देशपांडे इत्यादी लेखकांनीही लेखन करून हा कालखंड समृद्ध करण्यास हातभार लावला. तसेच या कालखंडामध्ये स्त्री लेखिकांनी ही मोठ्या प्रमाणात लेखन करण्यास सुरूवात केली. स्त्री स्वतः शिकून सुशिक्षित झाली होती. त्यामुळे स्त्रिया आपल्या व्यथा वेदना साहित्यातून शद्वबद्ध करू लागल्या होत्या. आपले विचार लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करू लागल्या. विभावरी शिरूरकर, गीता साने, प्रेमा कंटक इत्यादी लेखिकांनी या काळात लेखन केले. या कालखंडावरती फडके, खांडेकर, माडखोलकर यांचा प्रभाव जाणवतो त्यांनी कादंबरीतून कलावाद, जीवनवाद, राजकारण मांडले तसेच स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ज्या चळवळी झाल्या त्या चळवळीचा पायाही याच कालखंडात भक्कम झाला. हा कालखंड मराठी कादंबरीच्या इतिहासातील महत्वाचा कालखंड म्हणून ओळखला जातो.

१९४७ ते १९६० या तिसऱ्या टप्प्यामध्ये सबंध देशपातळीवर महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकिय, आर्थिक अशा सर्वच पातळ्यांवर अनेक परिणामकारक घटनांचा समावेश होऊन बदल झाले. दुसऱ्या महायुद्धामुळे देशावरती कोसळलेली आपत्ती. त्यातून झालेली हानी. स्वातंत्र्य मिळण्यासाठी झालेल्या चळवळी, गांधीजींची हत्या, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विकासाकडे वाटचाल, डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या उद्धारासाठी दिलेला मूलमंत्र, अनेक चळवळी केल्या, बौद्ध धर्माची दिक्षा दिली. दलितांना समाजात स्थान देण्यासाठी प्रयत्न केला. औद्योगिकरणामुळे खेड्यातील लोकांचा लोंढा नोकरीच्या शोधात शहराकडे धावू लागला. त्यामुळे खेडी ओस पडली. शहरामध्ये झोपडपट्टी, दरिद्री लोकांची संख्या वाढू लागली. त्यामुळे उपासमार बेरोजगारांची संख्या वाढली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्वत्र शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे लोक लिहू वाचू लागले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले आपण जे वाचत आहोत त्यामध्ये जे लेखन आहे ते आपले वास्तव जीवन नसून पांढरपेशी जीवन आहे. त्यामुळे त्यांनी

आपल्या जीवनातील वास्तव घटना कोणताही आडपडदा न ठेवता साहित्यातून शद्बबद्ध केल्या. या सर्व घटनांचा परिणाम या कालखंडातील कादंबऱ्यांवरती झालेला दिसून येतो. त्यामुळे कादंबरी रंजनप्रधान कल्पनारम्यातून बाहेर येऊन वास्तवाला सामोरी गेली. श्री. ना. पेंडसे, व्यंकटेश माडगुळकर, र. वा. दिघे, उद्धव शेळके यासारख्या मान्यवर लेखकांनी या कालखंडात लेखन केले. तसेच सुमती क्षेत्रमाडे, विभावरी शिरूरकर, दुर्गा भागवत, ज्योस्त्ना देवधर यासारख्या स्त्री लेखिकांनीही लेखन केले.

१९६० नंतर उदयास आलेल्या भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीने एक नवे रूपच साकार करून साहित्याला एक वेगळे वळण दिले. वास्तव जीवन अनेक दिशेने विस्तारण्याचा हा कालखंड होय. या काळात कादंबरीतून रंजनतंत्राचा वापर कमी होऊन गांभीर्यपूर्वक वास्तव घटना शद्बबद्ध करण्याकडे साहित्य वळले. वेगाने बदलत जाणाऱ्या सामाजिक, राजकिय परिस्थितीसह शिक्षणाच्याही क्षेत्रात वाढ जोमदार पद्धतीने झाली. त्यामुळे बहुसंख्येने लिहणाऱ्यांची संख्या वाढू लागली. यातून १९६० नंतर ग्रामीण, दलित, पौराणिक, स्त्रीवादी इत्यादी अनेक साहित्य प्रवाह नावारूपाला आली. या प्रवाहांमुळे मराठी साहित्याचे दालन समृद्ध झाले.

रंजनवादी कादंबऱ्यांवरती फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या लेखनाचा प्रभाव जाणवतो. या कादंबरीला बहर आला तो हरिभाऊंच्या कालखंडात रंजनवादी कादंबरी नावारूपाला आली. लोकांचे मनोरंजन करण्याचे कार्य या कादंबरीने केले.

ऐतिहासिक कादंबरीत इतिहासातील घटना पुराव्यानुसार शद्बबद्ध केल्या जातात. ऐतिहासिक पुरूषांच्या विषयी लोकांच्या मनात एक विशिष्ट आदरभाव, मत तयार झालेले असते त्या मताला धक्का न लागता ऐतिहासिक लेखन करावे लागते. अथवा केले तर त्याला ठोस पुरावा उपलब्ध असावा.

चरित्रात्मक कादंबरी एका व्यक्तिच्या जीवनावरती लिहली जाते. त्या व्यक्तिचा संपूर्ण जीवनपटच कादंबरीतून साकार केला जातो.

पौराणिक कादंबरीतील पात्रे पुराणातून घेतली जातात. पुराणातील पात्रे घेऊन त्यानां नवे रंगरूप देऊन ती नव्याने वाचकांसमोर साकार केली जातात. परंतु त्या पात्रांना कोणताही धक्का न

लावता आहे तशाच ठेऊन इतर ठिकाणी बदल करून कथानकाला वळण देऊन कादंबरीची रचना केली जाते.

स्त्रीलिखित कादंबरीमध्ये एकोणिसाव्या शतकानंतर समाजात सुधारणा झाली. स्त्रियांकडे संकुचित दृष्टिकोनातून बघण्याची पद्धत कमी होऊन अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांना विविध जाचातून बाहेर काढले, अनेक सुधारणा केल्या, उच्च दर्जा दिला, त्यामुळे स्त्री सुशिक्षित झाली. लिहू लागली, वाचू लागली. त्यामुळे त्यांच्या समस्या, प्रश्न, व्यथा, वेदना साहित्यातून उमटू लागल्या. 'चंद्रप्रभाविरहवर्णन' १८७२ ही साळुबाई तांबवेकरांची स्त्रियांविषयीची पहिली कादंबरी होय.

दलित कादंबरीपाठीमागे डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज या समाजसुधारकांची वैचारिक प्रेरणा आहे. दलित कादंबरी खऱ्या अर्थाने १९६० नंतर नावारूपाला आली. तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचू लागली. त्यामुळे अशिक्षित मागासलेले लोकही शिकू लागले. त्यामुळे त्यांनी आपल्या समाजाच्या व्यथा, वेदना, दुःख, शोषण जीवनात जे सोसले भोगले ते जसे आहे तसे साहित्यातून शद्बबद्ध केले. यातूनच दलित साहित्य निर्माण झाले. दलित साहित्यावरती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणात जाणवतो. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, अशोक व्हटकर, शरणकुमार लिंबाळे यासारख्या लेखकांनी दलित साहित्यामध्ये लेखन केले. दलित साहित्यामध्ये स्त्री लेखिकांनी फारसे लेखन केलेले दिसत नाही.

ग्रामीण कादंबरी – प्राचीनकाळापासून आजपर्यंत शेती हा मुख्य व्यवसाय मानला जातो. देशात ७० टक्के लोक शेती करतात. या शेतकऱ्यांच्या जीवनातील व्यथा, वेदना त्यांच्या समस्यांचा आरसा या साहित्यातून वास्तव पद्धतीने साकार होऊ लागला. यातूनच ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली. अनेक अभ्यासकांनी ग्रामीण साहित्याच्या व्याख्या केल्या आहेत. श्रीराम गुंदेकर ग्रामीण साहित्याच्या व्याख्ये संदर्भात म्हणतात, ''कृषिनिष्ठग्रामीण जाणिवांचा कलात्मक, उत्कट सहजाविष्कार म्हणजे ग्रामीण साहित्य होय.''

ग्रामीण साहित्यातील कृष्णराव भालेकर यांची 'बळीबा पाटील' १८८८ ही कादंबरी पहिली कादंबरी मानली जाते. धुनर्धारी यांची 'पिराजी पाटील' १९०३ या कादंबरीमध्ये खेड्याचे ग्रामव्यवस्थेचे,



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दैनंदिन जीवनातील व्यवहाराचे, समस्यांचे, भ्रष्टाचाराचे सरकार शेतकऱ्यांविषयी काहीच करीत नाही याची चीड या सर्वांचे अतिशय वास्तवपद्धतीने चित्रण केले आहे. सुरूवातीच्या काळातील कादंबऱ्यांवरती हरिभाऊ, ना. सी. फडके यासारख्या उच्च मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या लेखकांचा प्रभाव होता. जे लेखन होत होते ते पांढरपेशी लोकांकडून आपण जे जीवन जगतो त्याही पलिकडे जीवन जगणारे लोक आहेत. त्यांचेही जीवन साहित्यातून येऊ शकते. याची जाणीव मोजक्याच लोकांना होती. ७० ते ८० टक्के लोक खेड्यात राहणारे असून ग्रामीण जीवन साहित्यातून अभावानेच आले त्यामुळे 'पिराजी पाटील' नंतर पुढे २०-२५ वर्षे ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांची निर्मिती झाली नाही.

१९२० ते १९४० दरम्यान ग्रामोद्धाराच्या चळवळी झाल्या. त्या चळवळीतून निर्माण झालेल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक बदलांचा परिणाम या काळातील मराठी साहित्यावरती झाला. गांधीजीनी 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला. याच दरम्यान मार्क्सवादी विचारांचे वारे वाहू लागले. शाहू महाराज, भाऊराव पाटील यासारख्या समाज सुधारकांनी गोरगरिबांचा विकास, शिक्षणाचा प्रसार केला. त्यातून लोक अल्पप्रमाणात का होईना लिहू वाचू लागले. आपल्या समस्या, व्यथा, वेदना साहित्यातून शद्बबद्ध करू लागले. इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम या काळातील साहित्यावरती झाला. प्र. ह. खाडिलकरांची 'स्वाधीन संसार', ना. वि. कुलकर्णी यांची 'शिपाई', ग. रा. वाळिंबे यांची 'मोहित्यांची मंजुळा', वि. वा. हडप यांची 'उपाशी', भा. वि. वरेकर यांची 'सात लाखातील एक', वि. ल. बर्वे यांची 'मुचकुंददरी' इत्यादी कादंबऱ्या लिहल्या गेल्या.

१९३८ नंतरच्या काळात भारतीय स्वातंत्र्ययुद्ध कमालीचे गतिमान झाले. क्रांतीची बीजे खेड्यापाड्यातील सामान्य माणसांपर्यंत पोहचली. अनेक लेखक राजकीय नेते यांनी आपले लक्ष खेड्याकडे वळवले याचा परिणाम म्हणून कादंबरीमध्ये प्रादेशिक कादंबरी अवतरली प्रादेशिक कादंबरी एक प्रकारे ग्रामीण कादंबरीच होती. प्रादेशिक कादंबऱ्यातून विशिष्ट भूप्रदेश चित्रित केला आहे. त्यामध्ये र. वा. दिघे यांची 'पाणकळा', 'सराई', म. भा. भोसले यांची 'समरांगन', द. र. कवठेकरांची 'रेशमाच्या गाठी' इत्यादी कादंबऱ्यांचा समावेश होतो.

१९४५ नंतरचा काळ मात्र एकूण वाङ्‌मयातील परिवर्तनाचा काळ आहे. या काळातील लेखकांनी वास्तवाचे चित्रण केले आहे. मानवी जीवनातील ताण–तणाव माणसांच्या जाणीवा त्यांच्या मनात छळणारे प्रश्न, समस्या तसेच सामान्य माणसांचे, उपेक्षितांचे चित्रण त्यांच्या जाणिवांसह येऊ लागले. बा. सी. मर्ढेकर यांची 'रात्रीचा दिवस', विभावरी शिरूरकरांची 'बळी', बा. भ. बोरकर यांची 'भावीण', श्री. ना. पेंडसे यांची 'एल्गार', गो. नी. दांडेकरांची 'शितू' प्रादेशिक ग्रामीण कादंबरीने माणसाला प्रदेशापासून वेगळे करता येत नाही कारण तोही त्या वातावरणाशी एकनिष्ठ झालेला दिसतो.

व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी', अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' इत्यादी कादंबऱ्या वास्तवस्पर्शी चित्रण करतात. उद्धव शेळके यांची 'धग' ही कादंबरी या कालखंडातील शेवटची व महत्त्वाची कादंबरी आहे. मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रारंभ ते १९६० पर्यंतचा प्रवास असा आहे. काळाच्या बदलानुसार ग्रामीण साहित्यातही बदल होत गेलेले दिसतात. तसेच विविध घटनांचा परिणाम साहित्यावरती झालेला दिसतो.

ग्रामीण कादंबरीची परंपरा खूप जुनी आहे. परंतू १९६० नंतर ती नावारूपाला आली. १९६० नंतर जलदगतीने शिक्षण प्रसार सुरू झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुशिक्षित झालेली ग्रामीण भागातील संवेदनशील तरूणपिढी लिहू लागली. साहित्य निर्मिती करू लागली. त्यांनी साहित्यातून ग्रामीण जीवन शद्बबद्ध करायला सुरूवात केली. ग्रामीण माणूस, भाषा, मन, कृषीनिष्ठ संस्कृती, गावगाड्यातील समाज, निसर्गाधिनता, दैववादीपणा, शोषण, दारिद्र्य इत्यादी अनेक नव्याने येऊ लागले. यातूनच ग्रामीण साहित्याचा प्रवाह निर्माण झाला. या प्रवाहापाठीमागे महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या प्रेरणा स्पष्टपणे दिसतात. औद्योगिक क्रांती झाल्यामुळे लोक शहराकडे धावू लागले. परंतु आमचा शेतकरीराजा मात्र गावातच गावगाडा सांभाळत राहिला. आधुनिक सुख–सुविधांपासून वंचित राहिला. परंपरेने चालत आलेला शेती व्यवसाय त्याने केला. परंतु तो दिवसेंदिवस त्याच चक्रात अडकून कर्जबाजारी झाला. अशा या शेतकऱ्यांच्या समस्या, दुःख, निसर्ग, जत्रा–यात्रा, अलुतेदार बलुतेदार, सहकारी संस्था, भ्रष्टाचार, आधुनिकीकरण, तंत्रज्ञान, दुष्काळ इत्यादी सर्व गोष्टी आपल्या रूपागुणासह ग्रामीण कादंबरीत कमी अधिक प्रमाणात वावरताना दिसतात. ग्रामीण कादंबरीत काळानुसार अनेक बदल झाले. जे बदल झाले त्यांचे परिणाम त्या कादंबरीतून जसेच्या तसे शद्बबद्ध झाले. साठोत्तरी

ग्रामीण कादंबरीमध्ये आनंद यादव, सदानंद देशमुख, शेषराव मोहिते, दिवाकर चौधरी व मोहन पाटील हे महत्त्वपूर्ण ग्रामीण कादंबरीकार ठरतात. दिवाकर चौधरी यांची 'बुझ्र्वागमन', मोहन पाटील यांची 'साखरफेरा' या कादंबऱ्या ग्रामीण जीवनातील शेती विषयक समस्यांचा वेध घेताना दिसतात. इतरही अनेक लेखकांनी लेखन केलेले दिसते आहे. ग्रामीण साहित्यामध्ये स्त्री लेखकांनी फारसे लेखन केलेले दिसत नाही.

दुसऱ्या प्रकरणामध्ये 'दिवाकर चौधरी' यांच्या 'बुझ्र्वागमन' कादंबरीतील आशयसुत्र व इतर घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. दिवाकर चौधरींनी कादंबरीतील कथानकाची मांडणी अतिशय सुत्रबद्ध पद्धतीने केली आहे. इतर कादंबऱ्यांपेक्षा या कादंबरीच्या कथानकाची मांडणी वेगळी आहे. शेतकरी जीवनातील समस्या एका पाठोपाठ एक जणू पुराणातील एक अध्याय झाला की दुसरा अध्याय सांगितल्या प्रमाणे आहेत. कथानकातून शेतकऱ्यांचे न संपणारे दुःख मांडले आहे. लहरी निसर्ग, व्यापारी, भ्रष्टाचार, सरकारचा शेतकऱ्यांकडे पहाण्याचा उदासिन दृष्टिकोन या सर्वांवर अवलंबून असलेली शेती ही शेतकऱ्याला दुर्बल, अस्थिर करून कशी सोडते याचे चित्रण केले आहे. शेती विषयीचे वर्तमान वास्तव अतिशय प्रखरपणे दिवाकर चौधरींनी या 'बुझ्र्वागमन' मधून मांडले आहे. कादंबरीकाराने स्वतःच्या दुःखाबरोबर शेतकरी समाजाचेही दुःख अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे.

दिवाकर चौधरी कादंबरीमध्ये कथानक व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून पुढे न नेता शेतकरी जीवनातील विविध समस्या वास्तव पद्धतीने मांडत कथानक पुढ नेण्याचा अतिशय प्रभावी प्रयत्न केला आहे. कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा या कृषी जीवनातील आहेत. कादंबरीमध्ये व्यक्तिरेखा या मोजक्याच आहेत. गरजेपुरता त्यांचा वापर करण्यात आला आहे. लेखक हे स्वतः कादंबरीचे निवेदन करत असल्यामुळे ते कादंबरीत वारंवार येतात. त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी कल्पना ही प्रेमळ, पतीच्या फाटक्या प्रपंचातही धैर्याने उभी राहणारी, म्हणून वावरताना दिसते. लेखक आपल्या कुटुंबाविषयी, मळ्याविषयी माहिती सांगताना त्यांच्या आई-वडिलांची माहिती आली आहे. नामा व विकास हे दोघेही वेगवेगळ्या वृत्तीचे नोकर लेखकांच्याकडे सालगडी म्हणून राहिले आहेत. भानावाईंडर हा लेखकांच्या विश्वासातील वायरमन होता. इत्यादी मुख्य व्यक्तिरेखा कादंबरीमध्ये वावरताना दिसतात.

कादंबरीमध्ये स्त्रीपात्रे फारशी वावरताना दिसत नाहीत. तसेच इतरही गौण व्यक्तिचित्रणे कादंबरीत अल्पप्रमाणात साकार झाली आहेत.

दिवाकर चौधरींनी संवादासाठी लेवागणबोलीचा वापर केला आहे. कादंबरीचे कथानक जरी डांभूर्णी, ता. यावल या गावच्या परिसरावरती आधारित असले तरी त्यातील समस्या सर्व शेतकऱ्यांच्या आहेत. संवादातून वास्तव जीवनाचे चित्रण हेच या कादंबरीचे यश आहे. कादंबरीतील संवाद अतिशय सहज व प्रभावी आहेत. कादंबरीमध्ये शेतकऱ्यांचे वास्तव जीवन आल्यामुळे त्यांची दुःखे, संकटे, दारिद्र्य, पूर्वीच्या व आधुनिक शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, व्यापाऱ्यांच्या विरूद्ध चीड, भ्रष्टकारभार, समाज व्यवस्थेविरूद्ध भाष्य इत्यादी प्रसंगाच्या वर्णनातील रोखठोक परखड वास्तव संवादामुळे ते वाचकांच्या हृदयाला भिडते. तसेच लेवागण बोलीतील संवादामुळे कादंबरीला एक वेगळेच रूप प्राप्त झाले आहे.

कोणत्याही साहित्याचे सौंदर्य व कलात्मकता ही लेखनात वापरलेल्या भाषेवर अवलंबून असते. ज्या गावात लेखक वाढले, शिकले, जगले या परिस्थितीतील बोलीचा वापर यात लेखकांनी केला आहे. तसेच लेवापाटीदार समाजाचे शेती व्यवसायावरतीही खूप प्रेम आहे. त्या परिसरातील लोकांची ती भाषा आहे. त्यामुळे त्या परिसरातील म्हणी, वाक्यप्रचार, उपमा, शब्दसौंदर्य यांचा प्रभाव या लेखनावरती जाणवतो. लेवागण बोलीतून वास्तव शेतकरी जीवनाचे दर्शन घडविले आहे. कथानकाची मांडणी करताना प्रश्नार्थक शैली, लोपचिन्ह, उद्‌गारवाचक चिन्ह इत्यादी चिन्हांचा वापर हा योगायोगाने आला आहे. यांच्या वापरामुळे भाषा अधिक प्रभावी व शुद्धलेखनाचे नियम जोपासणारी दिसते. तसेच या चिन्हांमधून विविध भाव व्यक्त केले जातात. उपमा, म्हणी व वाक्यप्रचार यांच्या वापरामुळे भाषेला साजशृंगार चढवल्यासारखे वाटते. समर्पक व अर्थपूर्ण ग्रामीण उपमांमुळे भाषेला उठावदापणा आला आहे. तसेच म्हणी व वाक्यप्रचार यांच्या वापरामुळे भाषा अधिक समृद्ध झाली आहे. शिव्यांच्या वापरामुळे कादंबरीत ग्रामीणतेच दर्शन घडते. शेतकरी लोकांना शिव्या देणे म्हणजे काहीच शुभअशुभ वाटत नाही. बोलता बोलता सहजा–सहजी ते शिव्यांचा वापर करतात. हिंदी, इंग्रजी शद्बांचा वापर जाणूनबुजून न करता सहजतेने हे शद्ब कथानकामध्ये आले आहेत. या सर्व घटकांच्या वापरामुळे कादंबरीची भाषा समृद्ध व परिणामकारक झाली आहे.

लेखकांनी निवेदनासाठी तसेच पात्रांच्या संवादासाठी लेवागण बोलीचा वापर केला आहे. तसेच तृतीयपुरूषी निवेदन पद्धतीचा वापर केला आहे. लेखकांची निवेदन पद्धती, त्यांची अनुभव कथन करण्याची शैली, त्यांची भाषा उपरी नाही तर आपल्या अंतर्मनातील वेदनेला शेतकऱ्यांच्या दुःखद जीवनाला शद्बबद्ध करून वाचकांच्या हृदयाला पीळ पाडणारी आहे.

कादंबरीचे लेखन दिवाकर चौधरींनी झपाटलेल्या अवस्थेत केले असून त्यावरती कोणतेही संस्कार केलेले नाहीत. जे आहे तसे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लेखक हे फैजपूर साखर कारखान्याचे संचालक होते. तेव्हा शेतकऱ्यांचा ऊस पूर्णपणे गाळप न झाल्याने खूप नुकसान झाले. त्यामुळे लेखक दुःखी झाले. कारण कारखाना प्रशासनाच्या चुकीच्या कारभारामुळे लेखकही त्यास एक जबाबदार घटक होते. त्याच काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या दोन चार बातम्या वाचनात आल्या. तसेच काही वर्ष स्वतः शेती केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनातील सविस्तर माहिती लेखकांना होती. या सर्व घटनांच्या प्रेरणेतून लेखकांनी 'बुझ्वागिमन'चे लेखन केले.

संपूर्ण कादंबरीचे सार या शीर्षकामध्ये सामावले आहे. बुझ्वा हा फ्रेंच शद्ब असून त्याचा अर्थ पुराणमतवादी असा आहे. शीर्षकाप्रमाणे मुखपृष्ठाचे सौंदर्य अतिशय दर्शनीय, दर्जेदार, सुचक, मनाला विचार करायला लावणारे आहे.

कादंबरीच्या आशयामधून शेतकऱ्यांच्या मनातील ठसठसणाऱ्या जखमांनी अस्वस्थ झालेल्या मनाचा, दुःखाचा, वेदनेचा, समस्यांचा, शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हा आशय ग्रामीण कृषी जीवनाशी निगडीत आहे. कृषी जीवनाचे सखोलपणे निरीक्षण केल्याने, तसेच आपले स्वतःचे अनुभव कादंबरीतून चित्रीत केल्यामुळे आशयाला व्यापकता प्राप्त झाली आहे. ग्रामीण जीवनातील सुक्ष्म निरीक्षणामुळे त्यांचे लेखन वास्तवाभिमूख झाले आहे. शेतकऱ्यांना वेळोवेळी अनेक संकटाना तोंड द्यावे लागते. अशा या संकटांचा भार सोसत शेतकरी जीवन जगत असतो. जीवनात येणारी सुख–दुःखे, दुःखातून पुन्हा उभारण्याचे धैर्य या सर्व गोष्टींचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

अशाप्रकारे दिवाकर चौधरी यांच्या 'बुझ्वागिमन' कादंबरीमध्ये कादंबरी लिहण्यापाठीमागे लेखकांची भूमिका, व्यक्तिचित्रण, भाषाशैली, लेवागणबोली, निवेदनशैली, शीर्षक या सर्व घटकांच्या आधारे कादंबरीचा अभ्यास केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये मोहन पाटील यांच्या 'साखरफेरा' कादंबरीतील आशयसुत्रे व इतर घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. या कादंबरीमध्ये कृषीजीवनाशी निगडीत आशय व्यक्त केला आहे. अधिच आर्थिक गर्ततेत सापडलेल्या किशाने कशीतरी पैशाची जुळवाजुळव करून उभारलेला ऊस धडाधडा पेटतो. त्यामुळे किशाच्या माध्यमातून शेतकरी बांधवांची आर्थिक परिस्थिती किती बिकट असते याची जाणीव होते. त्याचबरोबर नशिबही किती शेतकऱ्याची परीक्षा पाहते याचा प्रत्यय येतो. तरीही किशा खचून न जाता पुन्हा जोमाने उभा राहतो आणि ऊसाची लागण करतो. गावात कारखान्यामध्ये चाललेला मनमानी भ्रष्ट कारभार, सहकारातील सरधोपट राजकारण, सहकाराचे स्वाहाकारात झालेले रूपांतर, 'विना सहकार नाही उद्धार' या सारखी ब्रीद वाक्ये नावापुरतीच राहिली. पाण्याचा अपव्यय, ऊस दर प्रश्न, दर प्रश्नाचा गुंता, ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्याचे शोषण, साखर प्रश्नाचा गुंता त्याविरूद्ध शेतकऱ्यांनी उठविलेला आवाज 'साखरफेरा' मध्ये मोहन पाटील यांनी शद्बबद्ध केला आहे. यातून शेतकऱ्यांच्या जीवनातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भ्रष्टाचाराच्या समस्यांचा आराखडाच कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यातून त्यांची शेतकऱ्यांच्या अगतिकतेविषयी जिव्हाळा तळमळ व्यक्त होते. शेतकरी आणि सहकार क्षेत्रातील भ्रष्ट व्यवहार या विषयावरती कादंबरीचे लिखाण करून ग्रामीण कादंबरी क्षेत्रामध्ये वेगळे विश्व निर्माण केले आहे.

कादंबरीच्या कथानकाची सुरूवात कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या ऊसाच्या धडाधडा पेटणाऱ्या वणव्याने होते. तर शेवट ऊस आंदोलनामुळे शेतकऱ्यांना ऊसाला योग्य दर मिळाला त्यामुळे पेटलेला वणवा शेवटी सरकारच्या भरघोस मदतीच्या शिंतोड्याने शांत होतो.

कादंबरीचे कथानक हे सर्वस्वी व्यक्तिचित्रणाभोवती फिरत गतिमान होते. काही व्यक्तिरेखा या कृषीजीवनाशी निगडीत आहेत. 'साखरफेरा' मध्ये किशा हा आर्थिक परिस्थितीने गांजलेला गरीब कष्टाळू शेतकरी आहे. शामा, नामा हे त्यांच्यापेक्षाही गरीब कमी ऊस क्षेत्र असलेले आहेत. बोरीगाव सोसायटीचे चेअरमन जयसिंग अण्णा बातरे हे राजकारणी आहेत. परंतु इतर नेत्यांप्रमाणे भ्रष्टाचारी नाहीत. तुका मेंबर हे निःस्वार्थी प्रामाणिक कोणत्याही गोष्टीची हाव नसलेले आहेत. कारखान्याचे चेअरमन झोंबडे पाटील यांनी आणि त्यांच्या संचालक मंडळाने मिळून कारखाना प्रशासन मोडकळीस आणले होते. शेतकऱ्यांचा नेता भानुसिंग याने शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मिळवून दिला आहे. त्यामुळे तो शेतकऱ्यांच्या विश्वासातील धाडसी तडफदार नेता झाला आहे. याचबरोबर इतरही अनेक व्यक्तिरेखा आवश्यक तेथे मोजक्याच शद्वाचा वापर करून उभ्या केल्या आहेत. उदा. किशा खोत, भरमू, शिंगटेसाहेब तसेच कादंबरीमध्ये किशाची पत्नी कल्पना, सुंदरी, रोजगारी स्त्रिया इत्यादी मोजकी स्त्रीपात्रे वावरताना दिसतात. संपूर्ण कादंबरी पुरूष व्यक्तिचित्रणांच्या माध्यमातून शेतकरी जीवनातील, राजकारणातील, सहकारातील गुंतागुंत उलगडत गतिमान होताना दिसते. व्यक्तिचित्रणांच्या माध्यमातून लेखकांनी शेतकऱ्यांची, सहकाराची, नेत्याची वास्तव स्थिती समाजासमोर मांडण्याचा प्रभावी प्रयत्न केला आहे.

कोणत्याही साहित्याचे सौंदर्य, कलात्मकता हे त्या साहित्यात वापरलेल्या भाषेवरती अवलंबून असते. या कादंबरीतील भाषाशैली, बोली भाषेतील शद्वप्रयोग, वाक्यप्रचार, म्हणी, उपमा, शिव्यांचा वापर, निसर्गवर्णन, प्रसंग रेखाटण्याचे कौशल्य, काव्यात्मकता या विशेषांच्या बरोबरच लेखकांच्या मनाची प्रगल्भता, त्यांच्या संयमी मनाचे दर्शन, सध्या समाजामध्ये अतिशय ज्वलंत असलेले ऊसदर प्रश्न, सहकारातील भ्रष्टाचार, साखर सम्राटांची मक्तेदारी इत्यादी अनेक प्रश्नांच्या विवेचनातून त्यांच्या संयमी मनाचे दर्शन व त्यांच्या अनुभवाचा आवाका स्पष्ट होतो. कारण कोणत्याही वाईट न वाटेल अशा पद्धतीने कादंबरीचे लेखन त्यांनी केले आहे. या सर्व गुण वैशिष्ट्यांमुळे या ग्रामीण कादंबरीला श्रेष्ठ दर्जाची गुणवत्ता पात्र होते.

मोहन पाटील यांनी 'साखरफेरा'मध्ये संवादासाठी पात्रांच्या कादंबरीतील स्थानानुसार भाषेचा वापर केलेला आहे. कोल्हापूर, सांगली तसेच कर्नाटक सीमा भागातील कथानक असल्यामुळे प्रादेशिक बोलीचा प्रभावी वापर संवादावरती जाणवतो. कादंबरीतील संवाद ग्रामीण, नागरी, हिंदी, कानडी भाषेतून आहेत. संवादामुळे कादंबरीतील समस्या थेट हृदयाला जाऊन भिडतात. एवढ्या तन्मयतेने त्या संवादातून साकार होताना दिसतात.

कादंबरी ही ग्रामीण असल्यामुळे वातावरण निर्मितीला ग्रामीण पार्श्वभूमीच लाभली आहे. वातावरण व प्रसंग हे कथानकाशी व्यक्तिचित्रणाशी समरस होताना दिसतात. तसेच वातावरण प्रसंगामुळे कथानक उठावदार होते.

'साखरफेरा' या कादंबरीला ग्रामीण पार्श्वभूमी लाभल्यामुळे निसर्गवर्णन हे असणे स्वाभाविकच आहे. बोरीगाव मध्ये पाणी सोसायटीचे शेतीसाठी पाणी भरपूर असल्याने पाण्याची टंचाई नाही. त्यामुळे बघेल तिकडे हिरवीगार शेती दिसत आहे. त्यात जास्तीत जास्त ऊसाची नगदी पीके खूप आहेत. तसेच उन्हाळा व हिवाळा या दोन ऋतुंचे वातावरणाचे वर्णन आले आहे. किशाचा फड फेब्रुवारी महिन्यात उन्हाचा पेटला होता. तर हिवाळ्यामधील थंडीचे धुके, पहाटेचे दव, पाखराची किलबिलाट, कारखान्याचा बॉयलर पेटवणे इत्यादी वर्णनेही ऋतुंची ओळख पटवतात.

'साखरफेरा' मध्ये 'मोहन पाटील' यांनी आत्मनिवेदनात्मक पद्धतीचा वापर केला आहे. या निवेदन पद्धतीच्या आधारे त्यांनी वास्तववादी जीवनानुभव कथन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच निवेदनासाठी ग्रामीण व नागरी भाषेचा वापर केला आहे.

'साखरफेरा' या कादंबरीचे शीर्षक विचार करायला लावणारे आहे. तसेच कादंबरीचा आशय या शीर्षकातून व्यक्त होताना दिसतो. शीर्षकातून कादंबरीच्या अंतरंगातील कथानकाचे धागेदोरे उलगडताना दिसतात.

मुखपृष्ठावरील चित्र कथानकाला अनुरूप आहे. त्या चित्रावरून कादंबरीच्या कथानकाची थोडक्यात माहिती येते. जणू काही सर्व कादंबरीचे सार या मुखपृष्ठावरतीच मांडलेले आहे. एवढे आकर्षक विचार करायला लावणारे आहे.

'साखरफेराच्या' आशयामधून ऊस शेतकऱ्यांच्या व्यथा–कथांचा जीवनपट साकारला आहे. ऊस जळूनही किशा पुन्हा हतलब न होता जोमाने उत्साहाने कसा उभा राहतो. पुन्हा ऊस लागण करतो. ऊस जळल्यामुळे किशाचे ऊसावरचे मन उडते. पुन्हा त्याला ऊसाची स्वप्ने पडू लागतात. किशा सारखा शेतकरी ऊस जळल्यामुळे कर्जाच्या विळख्यात सापडतो. त्यासाठी तो गुरे विकतो. याचे वास्तव या कादंबरीतून मांडले आहे. ऊसाला दर नाही म्हणून केलेले आंदोलन त्या आंदोलनाला मिळालेले हिंसक वळण व शेवटी विजय अतिशय सुंदर पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सहकारी संस्थांमधील राजकारणाची माहिती सोसायटी व साखर कारखान्यातील भ्रष्ट कारभारातून मिळते. कारखान्याकडून वा इतर संस्थांकडून, सरकारकडून शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या विविध सवलती. त्यापाठीमागील पुढाऱ्यांचे फायदे कसे होतात ते गरीब शेतकऱ्यांना कसे फसवतात. गरीब

शेतकरी त्यांच्या भूलथापांना कसे फसतात. या सर्व गोष्टींना विरोध करण्यासाठी शेतकरी संघटना उभारणे किती महत्वाचे आहे. या सर्व आशय सुत्रांच्या आधारे मोहन पाटील यांनी कथानक समृद्ध केले आहे.

अशाप्रकारे मोहन पाटील यांनी लेखन केल्यामुळे कादंबरीला व्यापकत्व प्राप्त झाले आहे. कोठेही मनोरंजनाच्या भूमिकेतून न लिहता वास्तव पटच साकारण्याचा प्रयत्न कादंबरीतून केला आहे.

प्रकरण चारमध्ये 'साखरफेरा' व 'बुझ्वागमन' या दोन्ही कादंबरीतील शेती समस्येचे स्वरूप व त्याची चिकित्सा केली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा–कथांचा आरसा जसा आहे तसा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबरीमध्ये त्यांनी ऊस हेच मुख्य पीक मानले आहे. ऊस पीक घेताना आलेल्या आर्थिक अडचणी, ऊस कारखान्याला घालवताना कराव्या लागणाऱ्या विनंत्या, योग्य दर मिळण्यासाठी केलेले आंदोलन, राजकीय, सामाजिक, नैसर्गिक समस्यांचा आढावा घेतला आहे. कादंबरीमध्ये शद्वबद्ध केल्या आहेत. शेतकरी जीवनातील वास्तव चित्र रेखाटले आहे. त्यामुळे पडद्याआड राहून भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांचे कारनामे समजू लागलेत. कोण कसा वागतो याचे सुत्र उलगडू लागले आहे. शेतकऱ्यांच्या मालाला दर नाही. त्यापाठीमागे असणारे राजकारण, पुढारी मंडळींची वागण्याची पद्धत, भ्रष्टाचार असे अनेक प्रश्न निवेदकांनी अतिशय कळकळीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. शेतीपासून व्यापाऱ्यांना, सरकारला भरपूर फायदा होतो. परंतु त्याच शेतकरी बांधवांना दोन वेळ पोटभर अन्न खाणेही परवडत नाही. म्हणजे जो शेतकरी धान्य, उद्योगधंद्यांना कच्चा माल पुरवतो तोच शेतकरी आज दारिद्रयाच्या गर्ततेत अडकलेला आहे. त्यातून बाहेर पडणे त्याला शक्य नाही. म्हणून तो आत्महत्या करत आहे. शेतमालाला योग्य भाव बाजारात मिळत नाही, अतिवृष्टी, पूर, नापिक जमीन, खतांचे, किटकनाशकांचे वाढते दर, योग्य वेळी न भरता आलेली कर्जे, भ्रष्टाचार इत्यादी अनेक कारणांमुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या हतबल झाला आहे. शेतकऱ्यांचे दारिद्र्य त्याला जीवनाबद्दल उदासीन व बेजबाबदार बनवते. या दारिद्रयापासून दूर होण्यासाठी प्रसंगी तो जीवापाड जपलेली

गुरेढोरे विकायलाही मागेपुढे पहात नाही. कोरडवाहू शेतकरी कितीही धडपड केली तरी बागायत शेतकऱ्याच्या बरोबरीने पैसे कमवू शकत नाही. याचा प्रत्यय किशा व गजा या दोन भावांच्या राहण्यातून येतो. साधा न्हाव्याचा व्यवसाय करणारा गणपाही व्यवस्थित जीवन जगू शकतो. परंतू भरघोस उत्पादन काढणारा शेतकरी मात्र आहे त्याच स्थितीत आहे. भांडवलाअभावी तो कष्ट करण्याची ताकत असूनही काही करू शकत नाही. आर्थिक समस्यांमुळे शेतकरी अडचणीत आला आहे. या सर्व सकटांपासून शेतकऱ्यांना दूर करण्यासाठी त्याच्या कष्टाला भांडवलाची साक्ष मिळाली तर शेतकरी शेतातून सोन्याचा धूर काढेल व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन समाजात सन्मानाचे स्थान मिळेल चार पैशासाठी त्याला कोणाकडे हात पसरावे लागणार नाहीत.

सहकारी संस्था या एकमेकांच्या सहकार्याने संघटित होऊन सर्वसामान्य लोकांचा उद्धार करण्यासाठी निर्माण झाले आहे. परंतु त्याचा फायदा सर्वसामान्याना न होता सत्ताधाऱ्यांनाच झाला ते संस्थांवरती स्वतःचे मालकी हक्क दाखवत होते. नाव फक्त सहकार कारभार मात्र खाजगीच. सहकारी संस्था जेव्हा उदयाला आल्या तेव्हा त्या सुस्थितीत होत्या. अनेक लोकांना त्याचा फायदा होत होता. उजाड माळाचे नंदनवन झाले. कच्च्या मालाला योग्य भाव मिळत होता. परंतु सहकारी संस्था मोडकळीस आल्या. आपला कारखाना म्हणणारा शेतकरी तुमचा कारखाना म्हणून लागला. सहकारातून सर्वांचा विकास होण्याऐवजी सत्ताधाऱ्यांनी स्वतःचाच विकास केला. संस्थाना राजकारणाचे अड्डे बनविले. चुकीच्या मार्गाने संस्थेचा पैसा खर्च करून संस्था रसातळाला नेल्या. या संस्थाना पुन्हा नावारूपाला आणण्यासाठी योग्य त्या लोकांची निवड करून त्याना सत्तेवरती आणले पाहिजे तेव्हा त्या संस्थामधील खाजगीकरण संपुष्टात येऊन संस्था पूर्ववत होतील. सर्वसामान्य माणूस आपली संस्था म्हणून प्रमाने व्यवहार करेल.

शेतकरी हा अहोरात्र कष्ट करूनही आर्थिक परिस्थिती नसताना देखील भरघोस उत्पादन काढतो परंतु त्या मालाला बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी तोट्यात जातो. त्याने पिकवलेल्या मालाचा भाव तो स्वतः न ठरवता व्यापारी ठरवतात. का कोणी दिला त्यांना हा हक्क. तसेच शेती उपयोगी खते, बियाणे किटकनाशके इत्यादी सामग्रीही महाग विकली जाते. एवढे उत्पादन काढूनही शेतकरी गरीब आणि त्याचाच माल विकून व्यापारी मात्र वातानुकुलीत गाडीमध्ये बसून

फिरत असतात. शेतकऱ्यांना बँकेत क्रेडीट नाही त्यांना दोन जामीनदार लागतात. व्यापाऱ्यांना मात्र लगेच पैसे देतात. सरकार ज्या योजना शेतकऱ्यांसाठी राबवतो त्या प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत किती पोहचतात. या योजनांचा लाभ त्यांना मिळतो का? इत्यादी अनेक घटनांना विरोध करण्यासाठी शेतकरी संघटित होऊन आपल्या न्याय हक्कासाठी लढला पाहिजे. जोपर्यंत तो न्याय मिळविण्यासाठी एकजूट होत नाही. सरकारवरती त्यांचा प्रभाव पडत नाही. तोपर्यंत त्याने काहीही केले तरी न्याय मिळणार नाही. अशाच प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'साखरफेरा' मध्ये मोहन पाटील यांनी संघटनेचे वारे वाहू दिले आहे व शेवटी त्याला विजयही मिळाला आहे.

महाराष्ट्रात साखर कारखाने निर्माण झाल्यापासून इतर पीके मातीमोल झालीत व ऊस या नगदी पीकाचे महत्त्व वाढले. ऊसामुळे शेतकऱ्यांना एक रकमी पैसे मिळून चार पैसे त्यांच्या हातात खेळू लागले. लोक आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाले. कष्ट करण्याची ताकद असुनही भांडवलाअभावी ऊस लावता न येणारे किशासारखे बरेच शेतकरी होते. ऊस लागणीसाठी त्यांचा जीव तुटत होता. अशा शेतकऱ्यांना कारखान्याने अनेक योजना राबवून ऊस लावण्यास मदत केली. ऊसाचे वैशिष्ट्य म्हणजे चार माणसात प्रतिष्ठा प्राप्त होऊन बँका कर्ज देतात. चार पैसे हातात खेळतात. कमी कष्टात एकरकमी पैसा मिळतो. त्यामुळे लोक ऊस पीकाकडे आकर्षिले गेले. कालांतराने कारखाना प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे वैतागले परंतु त्याला पर्याय नव्हता. तरीही ऊस पीक म्हणजे लोकांना जीव की प्राण वाटते.

साखर कारखान्यामध्ये ऊस दर हा गंभीर प्रश्न झाला आहे. कारखान्यातील प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे कारखाना डबघाईला येऊन कर्जबाजारी झाला. त्यामुळे कारखान्याला शेतकऱ्यांना ऊसाला योग्य दर देणे परवडत नाही. आणि एवढा कमी दर घेणे शेतकऱ्यांना परवडत नाही. कारण कारखाना आपला सर्व खर्च वजा करून कारखान्याला परवडेल असा दर जाहीर करणार. परंतु हे प्रशासन शेतकऱ्यांना यातून किती फायदा होतो? त्याला परवडते का? याचा विचार कोणीच करत नाही हा आपल्या समाजव्यवस्थेचा न्याय आहे. यासाठी शेतकऱ्यांनी संघटना निर्माण करून कारखान्याविरूद्ध आवाज उठविला आहे. काहीही झाले तरी ऊस कारखान्याला पाठवायचा नाही. हा निश्चय त्यांनी केला. अहोरात्र आंदोलन चालू ठेवले तेव्हा सरकारला जाग आली व त्यांनी ऊसाला योग्य भाव दिला.

महाराष्ट्रात साखर कारखाने खूप आहेत परंतु त्यांची अवस्था खूप वाईट झाली आहे. कारखाना प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे संस्था डबघाईला आली. कारखाना उभारण्यापाठीमागचे उद्दिष्ट म्हणजे सर्वांगीण विकास होता. परंतु असे न होता विकास हा सत्ताधारी कुटुंबाचा झाला. पुढारी मनमानी कारभार करू लागले. काही वेळा तर राजकारणासाठी चार माणसे राखण्यासाठी चुकीचे निर्णय घेतले. कामापेक्षा जास्त नोकरभरती केली. त्यांचे पगार, संचालक मंडळांचे गाड्या पळविणे, इतर खर्च यामुळे कारखाना अडचणीत आला. त्यातून बाहेर पडण्यासाठी कर्ज घेतले गेले.वेळेवरती कर्ज न भरल्यामुळे व्याज वाढत जाऊन कारखाना अडचणीत आला. त्यामुळे लोकांचा संस्थेवरून विश्वास उडाला. आता कारखाना कर्जबाजारी आहे. म्हणून दर द्यायला परवडेल का नाही. कारखाने जर बंद पडले तर अर्थव्यवस्था कोलमडेल यासाठी कारखाना प्रशासनाने योग्य निर्णय घेऊन कारभार सुरळीत चालवला पाहिजे. अन्यथा सर्व सहकारी संस्था नष्ट होतील. त्यामुळे शेतकऱ्याचेही नुकसान होईल त्यापेक्षा दोघांनीही एकमेकांना सहकार्य करून दोघांचेही नुकसान थांबले पाहिजे. त्यातच शेतकरी व कारखाना यांचा फायदा आहे.

भ्रष्टाचाराची पाळेमुळे ही सर्वत्र पसरली आहेत. त्यामुळे कोणतीही व्यक्ती प्रामाणिक राहिली नाही. प्रत्येकजण पगार असताना देखील वेगळे आपल्याला किती मिळते आहे याचा विचार करतात. आणि ऊस उत्पादक शेतकरी मात्र जे स्वतःचे हक्काचे आहे त्यालाच योग्य दर मिळतो का नाही? या विवंचनेत असतो. अशी बिकट परिस्थिती समाजात निर्माण झाली आहे. भ्रष्टाचाराने संपूर्ण समाज पोखरला आहे. या भ्रष्टाचाराच्या विळख्यात फक्त सर्वसामान्य जनता अडकली आहे. चार पैशाचे किंवा एखाद्या गोष्टीचे अमिश दाखविले की लोक आपला प्रामाणिकपणा विसरतात. ही मंडळी पैसे दिल्याशिवाय काम करत नाहीत. हेलपाटे घालायला लावतात रोज फेऱ्या मारण्यापेक्षा एकदाचे चार पैसे हातात टेकवून काम करून घ्यावे या वृत्तीने या लोकांचे खूपच फावते. लोकांचा त्यामुळे वेळ वाचतो, काम पटकन होते.

या भ्रष्टाचारातून मुक्त होण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरूवात केली. तसेच सत्ताधाऱ्यांनीही आपल्या हातात सत्ता, कारभार आल्यानंतर प्रामाणिकपणे व्यवहार केला पाहिजे. त्यामुळे जनतेला त्याचा फायदा होऊन संपूर्ण देश भ्रष्टाचार मुक्त होईल.

समाजामध्ये व्यसनाधिनतेचा प्रश्न गंभीर झाला आहे. पूर्वी फक्त वयस्कर लोकच व्यसन करत होते. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. दहा बारा वर्षाची मुले गुटखा, तंबाखू खाताना व दारू पिताना दिसतात. काही लोक व्यसन हे प्रतिष्ठेचे लक्षण म्हणून करतात तर काहीना वाईट वळण लागलेले असते. परंतु आमचा शेतकरी मात्र आपल्या दुःखाचा कुठेतरी विसर पडण्यासाठी मनाला तरतरी आणण्यासाठी पितो. दारू पिल्यामुळे, बीडी ओढल्यामुळे थोडावेळ का होईना त्यांची दुःखे दूर गेलेली असतात. म्हणून हे शेतकरी व्यसनाच्या आधिन होतात. हळूहळू त्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. त्यामुळे त्याना विविध रोग जडतात. शरीर संपत्ती नष्ट होते. समाजातही प्रतिष्ठा मिळत नाही. मुलाबाळांकडून, पत्नीकडून तुच्छ लेखले जाते. या व्यसनामुळे ते स्वतःच्याच जीवनाची राखरांगोळी करतात. छोट्याशा सुखासाठी संपूर्ण जीवनाची किंमत त्याना मोजावी लागते. याला कारण तुम्ही आम्हीच आहोत. कारण अशी दुःखेच त्यांच्या वाट्याला आली नाहीत. तर ते का म्हणून असे वागतील कोणाला आपल्या आयुष्याचा शेवट करण्याची आवड आहे.

ग्रामीण समाजात परंपरेने चालत आलेले सर्व सणवार अतिशय उत्साहाने पाळले जातात. हे उत्सव जर आपण केले नाहीत तर आपल्यावरती अनिष्ठ ओढवेल. अशी अंधश्रद्धा लोकांची असते त्यामुळे ग्रामीण भागातील लोक पैसा असू–नसू कोठूनही आणून त्या दिवशी आपल्या घरी सण, साजरा करीत असतात. तसेच ग्रामीण समाजात चेटुक, भानामती, नजर लागणे, जादुटोणा करते, भूतबाधा, भविष्य सांगणे यासारख्या गोष्टींवरती विश्वास असतो. अशाच अंधश्रद्धा आपल्याला 'साखरफेरा' मध्ये किशाच्या माध्यमातून पहायला मिळतात.

या सर्व समस्यांचा ऊहापोह प्रभावीपणे या प्रकरणात 'साखरफेरा' या कादंबरीच्या माध्यमातून मोहन पाटील यांनी केला आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये 'बुझ्र्वागमन' या कादंबरीतील समस्यांचा परिचय करून दिलेला आहे. शेती करताना बळीराजा हा दुरुन सुखी दिसत असला तरी प्रत्यक्ष किती दुःखी आहे. समस्यांनी ग्रासलेला आहे. त्याचे जीवन चित्रण अतिशय समर्पकपणे केले आहे. आर्थिक, रोजगाराची, व्यापारी, शैक्षणिक, सावकारकी, समाजव्यवस्था, मालक आणि नोकर यांच्यातील संबंध इत्यादी अनेक समस्यांचे वर्णन करून बळीराजाच्या जीवनाचा पटच प्रत्यक्ष उभा केलेला दिसतो या पासून सुटका

होण्यासाठी शासनदरबारी काहीतरी कार्यवाही व्हावी असे लेखकांनी मत व्यक्त केले आहे. एकविसाव्या शतकात भारत एक महासत्ता बनेल असे चित्र एकीकडे रंगविले जाते. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला शेतकरी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करत आहेत. देशाचा सर्वांगीण विकास न होता अल्पप्रमाणात झाला आणि बाकी सर्वसामान्य जनता दारिद्र्यात पिचत पडलेली आहे. या गरीब शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी पूर्ण जबाबदारीची भूमिका स्वीकारून शेतकऱ्यांशी इमान राखून कधीही तळापासून नियोजन झाले नाही जे झाले ते सगळे वरवरचे बंद वातानुकुलीत खोल्यांमध्ये बसून नियोजन करणाऱ्यांना प्रत्यक्ष शेतकऱ्यांची अवस्था काय कळणार. याच निराशेला, कष्टाला, समस्यांना कादंबरीतून वाचकांपर्यंत पोहचवून न्याय मिळवून देण्याचे कार्य दिवाकर चौधरींनी केले आहे.

आर्थिक समस्या या शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेल्या असतात. शेतकऱ्यांकडे कष्ट करण्याची ताकद जिद्द आहे. परंतु ते भांडवलाअभावी हतबल होतात. मनात असूनही नगदी पीके घेऊ शकत नाही. त्यात कोरडवाहू शेतकऱ्यांची तर खूप वाईट अवस्था आहे. शेतीत उत्पादन काढले तर दर नसतो. तर कधी दर असला तर उत्पादनच निघत नाही अशी अवस्था शेतकऱ्यांची असते. या आर्थिक नुकसानीतून बाहेर पडायचे असेल तर स्वतः शेतकऱ्याने सक्षम झाले पाहिजे. आपले प्रश्न आपणच सोडविले पाहिजेत. त्यासाठी कोणावरती अवलंबून राहून चालणार नाही. 'बुझ्र्वागमन' मध्येही दिवाकर चौधरींनी अशीच आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे मोटार समस्या, रोजगारी लोकांना बाजार दिवशी पैसे देणे, त्यासाठी रोजगाऱ्यांकडूनच व्याजाने पैसे घेणे, घरात पैसे आल्यानंतर केलेले नियोजन फिस्कटून दुसरीकडे पैसे खर्च होतात, त्यामुळे केलेल्या नियोजनाचा बोऱ्या होतो. नोकरदार मंडळी आणि आपला बळीराजा या दोघांच्या जीवनामधील तफावत, कर्ज भागविण्यासाठी जमीन विकणे म्हणजे स्वतःच्या आईला विकल्यासारखे वाटते. त्यामुळे या कर्जाला आर्थिक विवंचनेला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात. परंतु त्यांना कळत नाही. आपण यातून मुक्त झालो असलो तरी तो फास आपल्या मुलाबाळांच्या गळ्यात अडकणार. असा वाईट मार्ग पत्करण्यापेक्षा आलेल्या संकटांना धैर्याने सामोरे गेले पाहिजे. इत्यादी अनेक आर्थिक समस्या ज्या आपल्या सारख्यांना शुल्लक वाटतात प्रत्यक्षात त्या शेतकऱ्यांसाठी डोईजड असतात. याचे वर्णन अतिशय समर्पक शद्वात केले आहे.

शेती समस्येतील रोजगारी समस्या ही अतिशय बिकट समस्या आहे. कारण रोजगारी लोक एवढे शेफारले आहेत की त्यांना शेतकऱ्यांची किंमत राहिली नाही. शेतकऱ्यांच्या या अवस्थेमुळे ते त्याला पुरेपुर लुबाडतात. त्यांच्याकडे कामाला गेल्यानंतर अळमटळम करणे, काहीतरी निमित्त करून उगाचच बसणे असे करून दिवस भरतात एका दिवसाच्या कामाला दोन दिवस लावतात आणि शेतकऱ्यांकडून पैसे उकळतात. शेतातून जाताना त्यांच्या गुराना वैरण त्याच्याच बांधावरची नेतात. शेतातील भाजीपाला नेतात आणि त्याच्यावरतीच पावशेर ठेवतात. आलो की नाही अमक्या तमक्याकडे न जाता तुमच्याकडे कामाला. पण शेतकरी बिचारा काही बोलत नाही. अडला नारायण गाढवाचे पाय धरी अशी अवस्था त्यांची होते. कारण एकटाच ही सर्व कामे तो करू शकत नाही. मजुरांकडे खूप पैसे असतात. काही वेळा तर शेतकरी मजुरांचे पैसे भागविण्यासाठी त्यांच्याकडून व्याजाने पैसे आणतो. इकडे गरीब म्हणून मिरवतात आणि प्रत्यक्ष त्यांची स्थिती वेगळीच असते. म्हणजे मजुरांचे खायचे दात वेगळे दाखवायचे वेगळे असतात. पूर्वीच्या काळाचे मजुर हे अतिशय प्रामाणिक होते आणि आताचे मजुर चतुर, कामचुकार, स्वार्थी आहेत. यासाठी शेतकरी जर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करेल तर त्यांला भांडवलाअभावी ते परवडत नाही. अशाप्रकारे मजुरांची अवस्था म्हणजे 'नाकापेक्षा मोती जड' अशी झाली आहे.

व्यापाऱ्यांमुळे शेती व्यवसायाची धुळधाण झाली आहे. शेती व्यवसाय रसातळाला जाऊन लोकांचा त्यावरून विश्वास उडाला आहे. शेतकऱ्यांनी उन्हातान्हात राबून पिकवलेला माल हे व्यापारी कोणत्या हक्काने मालाचा दर ठरवून विकतात हेच कळत नाही. ज्याने उत्पादन काढले तो त्या उत्पादनाचा जमाखर्च ठरवेल हे व्यापारी कशावरून दर ठरविणार फायदा–तोटा त्यांना काय माहित. याला जबाबदार सरकार आहे. सरकारने शेतकऱ्यांना योग्य बाजारपेठ निर्माण करून देऊन मालाचा दर स्वतः शेतकरी ठरवेल असा नियम केला पाहिजे. अशी व्यवस्था नसल्यामुळे व्यापारी मनमानी कारभार करून शेतकऱ्यांना लुबाडू लागलेत. व्यापाऱ्यांना काय शेतकऱ्यांचा फायदा होवो अथवा तोटा त्यांना कमिशन मिळाले की झाले. शेतकरीही हे सर्व शांतपणे सोसतो कारण हा माल नाशवंत असतो. नाही म्हणावे तर हातात येईल ती लक्ष्मीही जाईल आणि माल ही खराब होईल, त्यापेक्षा आहे तेच घेऊन रिकामे व्हावे. त्यामुळे हे व्यापारी शेतकऱ्यांच्या पैशावर आलिशान गाडीतून फिरतात आणि

आमचा शेतकरी मात्र साधी बैलगाडीही घेऊ शकत नाही. अशी परिस्थिती या व्यापारी लोकांच्यामुळे निर्माण झाली आहे. म्हणजे फक्त बाजारपेठेतील व्यापारी शेतकऱ्यांना फसवतो असे नाही, तर समाजामध्ये जे कोणी शेती उपयोगी वस्तुंची खरेदी विक्री करतो त्यात काही शेतकरी बांधवांच्या मुलांचीही दुकाने आहेत ते देखील आपल्या बांधवांचा फायदा तोटा पहात नाहीत. स्वतःच्या स्वार्थाचा तेवढा विचार करतात. या विळख्यातून शेतकऱ्यांची सुटका करायची असेल तर सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, मदत, पॅकेज वगैरे न देता त्यांच्या मालाला योग्य भाव दिला पाहिजे म्हणजे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल.

संकरित बियाण्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. पूर्वीच्या बियाणातील सकसपणा चवदारपणा आताच्या बियाणात राहिला नाही. आताचे संकरित बियाणे बेचव झाले आहे. पूर्वीच्या काळी बियाणे विकत घेण्याची आवश्यकता नव्हती. शेतकरी वर्षाचे बियाणे बाजूलाच काढून ठेवत. बियाणाची देवाण घेवाण करत. परंतु आता परिस्थिती बदलली. उत्पादन काढण्याच्या हव्यासामुळे जाहिरातबाजीमुळे, बियाणे ठेवण्याच्या नियोजन शुन्यतेमुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. कंपन्यांनी तयार केलेले बियाणे विश्वासाचे नाही. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. परंतु आजच्या परिस्थितीचा विचार करता देशी बियाणापेक्षा संकरित बियाणे फायद्याचे वाटते कारण देशी धान्य सकस असते. परंतु त्याचे उत्पादन कमी निघते. याऊलट संकरित बियाणे बेचव असते. परंतु उत्पादन भरपूर निघते. आजच्या या वाढत्या लोकसंख्येला धान्य पुरवायचे असेल तर त्याला संकरित धान्याशिवाय पर्याय नाही. तसेच आधुनिक वस्तुंच्या म्हणजे खते, बियाणे, औषधे त्यांच्या वापरामुळे जमीन नापीक होऊ लागली आहे. म्हणजे शेतकऱ्यांची अवस्था 'इकडे आड तिकडे विहीर' अशी झाली आहे.

दिवसेंदिवस आधुनिकीकरणाच्या वापरामुळे शेतीचा पोत खालाऊ लागला आहे. तो वेळेत सुधारणे काळाची गरज आहे. अन्यथा सर्व जमीनी नापीक होतील. शेतीची निगा राखली तरी शेतीत सोने पीकते परंतु तिच्याकडे लक्ष दिले नाही तर ती दैन्य निर्माण करते. जमीनीचा पोत हा लगेच सुधारत नसतो, तर त्यासाठी वर्षानुवर्षे काळजी घ्यावी लागते. सरकार सर्व उद्योगधंद्याना प्रोत्साहन देत आहे. परंतु शेती सुधारण्यासाठी कोणत्याच गोष्टींचा अवलंब करत नाहीत. त्यासाठी ठिकठिकाणी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शेती संशोधन केंद्र उभारून जमीनीचे परिक्षण केले पाहिजे. जमीनीची प्रत सुधारण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले पाहिजे.

शेतकऱ्यांनी आपल्यावरती होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी एकत्र येऊन संघटना केली पाहिजे. कारण कोणतीही गोष्ट मागून मिळत नाही. ती मिळवावी लागते. शेतकरी जर दुसऱ्यावरती अवलंबून राहिला तर या दारिद्र्याच्या संकटातून कधीच मुक्त होणार नाही. त्यापेक्षा संघटीत झाला तर कोणत्याही जीवाला आपल्या अनमोल देहाला मुकावे लागणार नाही. व्यापारी, रोजगार, कारकुन, शिक्षक, कर्मचारी इत्यादी सर्वांच्या संघटना असल्यामुळे आपल्यावरती होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करतात आणि आमचा बळीराजा मात्र शेतकरी संघटना नसल्यामुळे सर्वांच्या पाठीमागे राहिला आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही नेतृत्वाची वाट न पहाता शेतकऱ्यांच्या शिकलेल्या मुलाबाळांनी आपल्या समस्या जाणून घेऊन धैर्याने जिद्दीने उभे राहून आपल्या बांधवांना न्याय मिळवून दिला पाहिजे. एका शेतकऱ्याने दुसऱ्या शेतकऱ्याचे भले चिंतले पाहिजे. एखाद्या ठिकाणी शेतकऱ्यांवरती अन्याय झाला तर जगातील सर्व शेतकऱ्यांनी आवाज उठविला पाहिजे. एवढी ताकत या संघटनेमध्ये असली पाहिजे तर शेतकरी सुखी होईल.

मालक आणि नोकर यांच्यातील संबंध अतिशय बिकट आहेत. परंतु दोघांनाही एकमेकांशिवाय पर्याय नाही. कारण शेतकरी एकटा सर्व कामे पार पाडू शकत नाही. नोकर कामे अतिशय पुरवून करतात. शेतकऱ्यांच्या फायद्याचा विचार करत नाहीत. मालक काही म्हटले तर लगेच चाल्लो मी. त्यामुळे मालक शांत असतो. यंत्रसामग्रीमुळे सालदारांनाच काय काम राहिले नाही. तेच कमरेवरती हात ठेऊन काम करून घेतात. मालकांच्या पेक्षा त्यांचीच ऐट वाढली आहे. अशा अनेक प्रसंगातून दिवाकर चौधरी मालक आणि नोकर यांच्यातील संबंधाचा उलगडा करतात.

दिवाकर चौधरींनी समाजातील व्यवस्थेविषयी जो संताप व्यक्त केला आहे तो अगदी बरोबर आहे. कारण कोणत्याही खालच्या वर्गातील लोकांच्याकडून झालेल्या चुकीचे खापर वरच्या वर्गातील लोकांवरती फोडले जाते. तसेच समाजातील लोकांना काही गोष्टीचे ज्ञान नसले तरी पोकळ माहिती वरती आपली मते मांडतात. शेतीच्या बाबतीत बोलायचे तर गहू, तांदुळ महागले, महागले म्हणून दंगा करतात. स्वतःच्या जेवणाच्या खर्चापेक्षा टी. व्ही., फ्रिज इत्यादी सुख सुविधांचा खर्च किती जास्त आहे तरी त्या वस्तुच्या महागाई बद्दल कोणी काही बोलत नाही. पूर्वीच्या व आताच्या लोकांच्या

राहणे, वागणे, बोलणे यातही खूप फरक पडला. समाजव्यवस्थेतील अशा अनेक घटकांवरती दिवाकर चौधरींनी भाष्य केले आहे.

पूर्वीच्या काळी सावकाराना खूप महत्व होते. सावकार म्हणजे राज्याची शोभा मानली जात होती. सावकारही विश्वासाने लोकांना मदत करत. परंतु आता परिस्थिती बदलली. पूर्वीचे महत्त्व सावकाराना राहिले नाही. आताच्या सावकारांची वर्तणूक बिघडली. त्यांनी शेतकऱ्यांची पिळवणूक करून त्यांना लुबाडले. त्यामुळे लोकांचा सावकारावरील विश्वास उडाला. सर्व सावकारांचा व्यवहार बिघडला आहे असे नाही तर काही सावकार व्यवहार सुरळीत चालवतात. कोणत्याही शेतकऱ्यांच्या घरी पैसे घेऊन जात नाहीत तर शेतकरीच त्यांच्या घरी जातात. वेळेला सावकार बँकेप्रमाणे कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता न करता पैसे देतात. एवढा विश्वास असूनही शेवटी शेतकरी वेळेवर कर्ज न भरल्यामुळे कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतात आणि शेवटी सावकारांच्या माथी खापर फोडतात. तसे पहायला गेले तर कोणत्याही गोष्टीचा एका बाजूने विचार करून चालणार नाही. सावकारांच्या बाबतीत म्हणायचे तर दोन्ही बाजूने विचार केला तर सावकार हे फायद्याचे व तोट्याचे ही आहेत. काही सावकार वाईट प्रवृत्तीचे असले तरी काही चांगलेही आहेत.

शेतकऱ्यांच्या मुलांमध्ये शिक्षणाची अवस्था बिकट झाली आहे. शेतकरी पोटाला चिमटा घेऊन मुलांना शिक्षण देतात आपल्या सारखे आपल्या मुलांचे हाल होऊन नये असे त्यांना वाटते. परंतु झाले मात्र उलटेच मुले शिकून पदव्यांची कागदे घेऊन नोकरीच्या पाठीमागे धावू लागली. सुशिक्षित बेरोजगारीचा प्रश्न वाढला. नोकरीही नाही आणि शेतातील काही जमत नाही. त्यामुळे मुलांच्या वाट्याला वाईट दिवस आले. तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना कोणी मुली द्यायला तयार नाही. शिपायाची नोकरी असलेला मुलगा चालतो परंतु शेतकरी नको असे लोक म्हणून लागले आहेत. यासाठी मुलांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचे छोटे मोठे व्यवसाय उभे केले पाहिजेत. स्वतःच्या पायावरती उभे राहिले पाहिजे म्हणजे कोणीही हिणवणार नाही. मुलांनी मात्र शिकून मोठे होऊन आपल्या गावाला काळ्याआईला विसरता कामा नये.

यासारख्या अनेक समस्यांचे दिवाकर चौधरींनी 'बुझ्र्वागमन' मध्ये विवेचन केले आहे. अशाप्रकारे चौथ्या प्रकरणामध्ये 'बुझ्र्वागमन' व 'साखरफेरा' या दोन कादंबऱ्यातील समस्या मांडल्या

आहेत. या समस्या दोन्हीही लेखकांनी कोणताही आक्रस्ताळेपणा न करता अतिशय संयमाने वास्तव घटनांच्या मदतीने नोंदविल्या आहेत. शेतकऱ्यांचे जीवन आपल्याला वाटते एवढे सुलभ नाही. तर प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या जीवनातील व्यथा, वेदना पाहिल्यानंतर त्यांच्या जीवनाचे महत्त्व लक्षात येते. दुरून साजरे दिसणारे जीवन प्रत्यक्ष आतून किती काटेरी असते याचा प्रत्यय येथे येतो.

१) 'बुझ्र्वागमन' व 'साखरफेरा' कृषी व्यवस्थेतील ज्वलंत वर्तमान वास्तवावर प्रकाश टाकणाऱ्या कादंबऱ्या आहेत.

२) दिवाकर चौधरींनी 'बुझ्र्वागमन' कादंबरीमध्ये बळीराजाच्या जीवनातील न संपणारे दुःख, लहरी निसर्ग, व्यापारी, सरकार, भ्रष्टाचार, मजुर, सावकार या सर्वांवर अवलंबून असलेली शेती ही शेतकऱ्याला अस्थिर करून कशी सोडते याचे चित्रण केले आहे. ते पांढरपेशी समाजातील लोकांना विचार करायला लावणारे आहे. कारण एवढ्या अडचणींना सामोरे जाण्याचे धैर्य या बळीराजाला कोठून आले.

३) शेतकरी आपल्या जनावरांवरती कुटुंबातील व्यक्तींप्रमाणे प्रेम करतो. जनावरे म्हणजे कुटुंबातील एक घटकच. स्वतःच्या जीवापाड तो जनावरांची सेवा करतो. मानवी जीवनात जनावरांचे महत्त्व किती आहे याचे चित्रण केले आहे.

४) खेड्यातील पोटभरू शेतकऱ्यांनासुद्धा जगण्यासाठी स्पर्धा करावी लागते. मग तो अंगठा बहाद्दर असो वा सुशिक्षित, द्राक्ष, आंबा, केळी यासारख्या बागायतदार शेतकऱ्यांबरोबर कोरडवाहू शेतकऱ्यांनाही कष्टाबरोबर आर्थिक साहस करावे लागते ते करताना त्यात फायदा होवो किंवा तोटा याचा विचार करून चालत नाही यासारख्या सर्व गोष्टींचा परामर्श घेतला आहे.

५) शेतकऱ्यांच्या मुलांनी शिकून सुशिक्षित बेकार राहण्यापेक्षा नोकऱ्यांची अपेक्षा न करता छोटा मोठा व्यवसाय केला पाहिजे. म्हणजे त्यांच्या लग्नाची समस्या निर्माण झाली आहे ती दूर होईल.

६) शेतकऱ्यांनी आपल्या संकटाना, आपल्यावरती होणाऱ्या अत्याचाराला, बाजारभावाला योग्य न्याय मिळवण्यासाठी ठराविक भागातील नाही तर संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन संघटना निर्माण केली पाहिजे.

७) शेतकऱ्यांची लुबाडणूक करणारे व्यापारी, सावकार, विविध संस्थामधील अधिकारी,

पुढारी यांच्याविषयीचे परखड विवेचन कादंबरीमध्ये केले आहे.

८) प्रत्यक्षात खरे कल्याण शेतकरीच करतो म्हणून त्याला समाज व्यवस्थेत मानाचे स्थान दिले पाहिजे. त्याच्याविषयी आदर ठेवला पाहिजे. त्याचा व्यवसाय महत्त्वाचा मानला पाहिजे असे विवेचन कादंबरीमध्ये आले आहे.

९) मोहन पाटील यांनी शेतकरी बांधवांच्या ऊस समस्येचे बदलत्या राजकारणांचे व सहकारी संस्थांचे चित्रण 'साखरफेरा'मध्ये अतिशय वास्तव पद्धतीने केले आहे.

१०) नव्या अर्थव्यवस्थेचा शेती संस्कृतीवरती झालेला परिणाम कादंबरीमध्ये पहायला मिळतो.

११) खेड्यातील बदलासाठी सहकार हा घटक महत्वाचा मानला गेला. साखर कारखाने, सोसायट्या, पतसंस्था, बँका अशा माध्यमांतून खेड्यातील आर्थिक स्तर उंचावेल असे सर्व सामान्यांना वाटत होते. परंतु त्याचा फायदा विशिष्ट घटकानांच झाला. सहकारातून शोषणाची नवी व्यवस्था निर्माण झाली.

१२) व्यापारी, सत्ताधारी, उद्योजक इत्यादी उच्च वर्गीय आपापले हित पाहण्यात मशगूल आहेत. कर्मचारी, कामगार संघटित आहेत ते संप, आंदोलने करून आपापल्या पदरात लाभ पाडून घेतात त्या तुलनेत शेतकरी असंघटित आहेत. म्हणून त्यांना कोणताच फायदा मिळत नाही. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी संघटित झाले पाहिजे.

१३) पूर्वी ऊसापासून गुळ निर्माण केला जात होता. तेव्हा शेतकरी सुखी होता. कालांतराने कारखाने उभारले जाऊन ऊसावरती प्रक्रिया करून साखर तयार करण्यात आली. साखरेमुळे सर्वांचा फायदा होईल असे अमिष दाखविले गेले. परंतु झाले मात्र उलटेच शेतकऱ्यांचा फायदा न होता शेतकरी साखरेच्या फेऱ्यात असा अडकला की त्यातून आता बाहेर येता येणे शक्य नाही.

१४) 'साखरफेरा'मध्ये संघर्ष हा ऊसदरासाठी आहे. या संघर्षामध्ये शेतकरी अडकला आहे. विरोधी असणारा सत्ताधारी पक्ष मात्र सतत बदलत असतो. सत्ताचक्र सतत बदलत असते. समजा तेच राहिले तरी त्यांची वागण्याची पद्धत दिवसेंदिवस भ्रष्टाचारीच होत असते. कितीही माया जमा केली तरी ती कमीच पडते. याचा अर्थच असा की माणसे बदलतात, पिढ्या बदलतात परंतु शेतकऱ्यांचे अस्तित्व धोक्यात आणणारा साखरेचाफेरा मात्र काही बदलत नाही. तो दिवसेंदिवस

अधिकच घट्ट होत चालला आहे. सत्ताधारी वर्ग व त्यांच्या पेचात अडकलेल्या बळीराजाचे अशाप्रकारे अतिशय परिणामकारक चित्रण केले आहे.

१५) कादंबरी वाचून संपल्यानंतर एक महत्त्वाचा प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण होतो. तो असा की जर शेतकरी संघटित झाला तर आपल्या संघटनेच्या जोरावर आपल्या प्रत्येक अन्यायाला उत्तर देऊन योग्य तो निर्णय घेऊ शकले. त्यामुळे तो स्थिर होऊन आर्थिकदृष्टचा सबल होईल. त्यासाठी शेतकऱ्यांना कोणाचे पाय धरावे लागणार नाही. इतरांप्रमाणेच समाजात त्यांला मानाचे स्थान मिळेल.

१६) 'साखरफेरा'मध्ये पांढऱ्या उंदरांचे वापरलेले प्रतीक अतिशय समर्पक आहे. तसेच स्वप्नातील उंदरांतून कादंबरीचा केलेला समारोप विचार करायला लावणार आहे. तसेच इतर कादंबऱ्यांपेक्षा वेगळा आहे. शेवटपर्यंत त्या पांढऱ्या उंदराच गुढ उकलेले दिसत नाही. पुन्हा कधी किशाला ती स्वप्नात दिसली असतील का? त्याला त्यांनी त्रास दिला असेल का? असे अनेक प्रश्न मनात निर्माण होतात.

१७) कमालीची सहनशीलता हे शेकतऱ्यांच्या जीवनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरू शकते.

१८) 'बुझ्र्वागमन' व 'साखरफेरा' या दोन्ही कादंबऱ्यातील समस्यांना प्रतिकार करून शेतकऱ्याने जोमाने उभे राहून संघटना निर्माण केली तर शेतकरी सुखी होईल आणि आपला देशही सुजलाम सुफलाम होईल.

*****